**भाग – 'अ'**
(न्यायनिर्णयाचे शिर्ष पृष्ठ)
(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

| | | |
|---|---|---|
| **MHWS040010162021** | | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर यांचे न्यायालय**<br>**( न्यायाधीश–ख्वाजा चॉ. कलाल )**<br>**(न्यायनिर्णय दिनांक ११/०८/२०२६)**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०६/२०२१**<br>**निशाणी क्र.०९ खाली** |
| | | प्रथम खबरी अहवाल/गुन्हा व पोलीस ठाणेचा तपशिल |
| तक्रारदार/फिर्यादी | | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर, जि.वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>**श्री. एस. एम. बाकलीवाल** |
| आरोपी | | **शेख मुजीब शेख इब्राहीम,**<br>वय–३९ वर्षे, व्यवसाय–चालक,<br>रा.गांधी चौक तेलीपुरा, मालेगांव, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| प्रस्तुतकर्ता | | **श्री. व्ही. ए. बेलोकार** |

**भाग–ब**

(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (२))

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७.१२.२०२० |
| प्रथम खबर अहवालची तारीख | २७.१२.२०२० |
| दोषारोपपत्राची तारीख | ३०.०३.२०२१ |
| दोषारोप ठेवण्यात आल्याची तारीख | २९.०१.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २७.०७.२०२१ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव केल्याची तारीख | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०८.२०२६ |
| शिक्षेची तारीख, असेल तर | निरंक |

**आरोपीचा तपशील —**

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटक तारीख | जमानत तारीख | गुन्हयाचे विवरण | शिक्षा किंवा निर्दोष | शिक्षेचा काला वधी | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार कारावासाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **शेख मुजीब शेख इब्राहीम** | फौ.प्र.सं.४१ (अ) प्रमाणे समजपत्रावर सोडले | —— | भा.दं.वि.चे कलम— २७९, ३३७ व ४२७ सह मो. वा. का.चे कलम १८४ | निर्दोष | निरंक | लागू नाही. |

**भाग—'क'**

(फौजदारी पुस्तिकाचे प्रकरण ६ चे परिच्छेद क्र.४४ (३))
सरकारी/आरोपींचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ. — सरकारी साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| १ | सुनिल यादवराव शिंदे | फिर्यादी |
| २ | चेतन सुनिल शिंदे | साक्षीदार |
| ३ | पवन पुंडलिक वाघ | घटनास्थळ पंच |

**ब. — आरोपीचे साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयाचे साक्षीदार :—**

| **दर्जा** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, प्रख्यात साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी/आरोपीचे/न्यायालयातील निशाणी दस्तऐवज.**

**अ. — सरकारी दस्तऐवज :—**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. — बचावपक्ष दस्ताऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. — न्यायालयीन दस्ताऐवज :—**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. — साहित्य/वस्तू :—**

| अनु.क्र. | वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | — | — |

## न्यायर्णिय

**( दिनांक ११/०८/२०२६)**

१. आरोपीचे विरुध्द भारतीय दंड विधानाचे, १८६० चे कलम २७९, ३३७ व ४२७ सह मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे —**

२. घटना ही दिनांक २७.१२.२०२० रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास मंगळसा फाट्याजवळ, ता. मंगरूळपीर, जि.वाशिम येथे घडली. सदर दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी हा त्याची मोटारसायकल क्र. एम.एच.२७ डी. ५६१७ ने मंगरूळपीर वरून बेलखेड येथील शेतामध्ये जाण्यासाठी निघाला होता. मंगळसा फाट्याजवळून फिर्यादीने गाडी हळू करून उजव्या हाताने साईड दाखवून मंगळसाकडे जात होता, त्यावेळी फिर्यादीच्या मागून आरोपीने पांढ—या रंगाच्या फोर व्हीलरने त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीला ठोस मारली. त्यावेळी फिर्यादी हा गाडीसह रोडवर खाली पडला व फिर्यादीच्या दोन्ही हाताला, पायाला, तोंडाला व छातीला मार लागला. सदर फोर व्हीलर गाडीचा स्पीड कमी झाला असता फिर्यादी हा सदर गाडीचा क्रमांक पाहिला व त्याचा क्रमांक एम.एच.३०—एल.९३१५ असा होता. त्यानंतर सदर गाडी ही कारंजाकडे निघून गेली. त्यानंतर फिर्यादी हा त्याच्या मुलाला फोन लावून बोलावले. फिर्यादीच्या मोटारसायकलचा अंदाजे ६,०००/— ते ७,०००/— रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे फिर्यादीने आरोपीच्याविरुध्द मंगरूळपीर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपीच्या

विरुध्द गुन्हा रजिस्टर क्रमांक १३८२/२०२० दाखल झाला. सदर गुन्हयाच्या तपासांती शिवदास चव्हाण पोलीस हेड कॉन्स्टेबल ब.नं.६९० यांनी आरोपीच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

३. अभियोग पक्षाच्या साक्षीपुराव्यांती आरोपीच्या विरूध्द काहीही पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही. आरोपीच्यातर्फे एकही साक्षीदार तपासण्यात आला नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी विद्यीज्ञ श्री.एस.एम.बाकलीवाल आणि आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.व्ही.ए.बेलोकार यांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, न्यायालयासमोर आलेला साक्षीपुरावा आणि उभयतांचा युक्तीवाद विचारात घेता खालील वादप्रश्न उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| प्र.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २७.१२.२०२० रोजी सायंकाळी ०७.३० वाजण्याच्या सुमारास मंगळसाफाटया जवळ मंगरुळ ते कारंजा रोड, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एम.एच.३०—एल.९३१५ ही कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगईने भरधाव वेगाने चालविली व त्यायोगे त्याने भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... नकारार्थी |
| २) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने मानवी जिवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगईने वर नमुद मोटारसायकल चालविली आणि फिर्यादीला पाठीमागुन धडक देवून त्याच्या दोन्ही हाताला, पायाला, तोंडाला व छातीला दुखापत केली असल्याने व त्यायोगे त्याने भा.दं.वि.कलम ३३७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | ... नकारार्थी |

| प्र.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ३) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या दुचाकी मोटरसायकल क्र. एम.एच.२६–डी.५६१७ याला धडक मारुन ६,०००/– ते ७,०००– रुपयांचे फिर्यादीचे गाडीचे नुकसान केले व त्यायोगे त्याने भारतीय दंड संहिता कलम ४२७ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ....... नकारार्थी |
| ४) | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील मोटारसायकल क्र. क्र. एम.एच.३०–एल.९३१५ ही अशा प्रकारे व एवढया वेगात चालवून वस्तुस्थितीचा विचार करता जनतेस धोकादायक होते आणि त्यायोगे आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | ... नकारार्थी |
| ५) | आदेश काय ? | ....अंतीम आदेशानुसार |

## कारणमिंमासा

**वादप्रश्न क्रमांक १ ते ४ करिता :**

**५.** वादप्रश्न क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रित करण्यात येत आहे. न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन करण्यासाठी अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.०१ सुनिल यादवराव शिंदे (फिर्यादी), अभियोग पक्षाचे साखीदार क्र.२ चेतन सुनिल शिंदे (फिर्यादीचा मुलगा) आणि अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.०३ पवन पुंडलिक वाघ (घटनास्थळ पंच) यांनी अभियोगपक्षाच्या हकीकतप्रमाणे साक्ष दिली नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे त्यांना फितुर घोषीत करुन त्यांचा उलटतपास घेण्यात आला. मात्र उलटतपासात देखील आरोपीच्या विरुध्द अभियोगपक्षास काही निष्पन्न झाले नाही. याउलट सदर साक्षीदारांनी त्यांच्या उलटतपासात अभियोग पक्षाची हकीकत नाकारली. त्यामुळे त्यांची साक्ष अभियोगपक्षाच्या उपयोगाची नाही.

**६.** फिर्यादीने त्याच्या उलटतपासात, घटना ही दिनांक २७.१२.२०२० रोजी सकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास मंगळसा फाट्याजवळ, ता. मंगरूळपीर, जि.वाशिम येथे घटना घडली, सदर दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादी हा त्याची मोटारसायकल क्र. एम.एच.२७–डी.५६१७ ने

मंगरूळपीर वरून बेलखेड येथील शेतामध्ये जाण्यासाठी निघाला होता, मंगळसा फाट्याजवळून फिर्यादीने गाडी हळू करून उजव्या हाताने साईड दाखवून मंगळसाकडे जात होता, त्यावेळी फिर्यादीच्या मागून आरोपीने पांढ—या रंगाच्या फोर व्हीलरने त्याची गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीला ठोस मारली, त्यावेळी फिर्यादी हा गाडीसह रोडवर खाली पडला व फिर्यादीच्या दोन्ही हाताला, पायाला, तोंडाला व छातीला मार लागला, सदर फोर व्हीलर गाडीचा स्पीड कमी झाला असता फिर्यादी हा सदर गाडीचा क्रमांक पाहिला व त्याचा क्रमांक एम.एच. ३०—एल.९३१५ असा आहे, त्यानंतर सदर गाडी ही कारंजा कडे निघून गेली, त्यानंतर फिर्यादी हा त्याच्या मुलाला फोन लावून बोलावले, फिर्यादीच्या मोटारसायकलचा अंदाजे ६,०००/— ते ७,०००/— रुपयांचे नुकसान झाले आहे, या सर्व बाबी नाकारल्या आहेत. अभियोगपक्षाचे साक्षीदार क्र.२ याने सुध्दा अभियोग पक्षाची हकीकत नाकारली. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.३ याने घटनास्थळ पंचनाम्यामध्ये काहीच सांगितले नाही व त्याने घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर नाकारले. त्यामुळे अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ व ३ यांची सुध्दा जबानी उपयोगाची नाही.

७. महत्वाची बाब म्हणजे अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.०१ ते ०३ यांनी आरोपी व साक्षीदार यांच्यामध्ये तडजोड झाली असल्याची बाब त्यांच्या उलटतपासात मान्य केली व त्याबाबतची तडजोड पुरसीस निशाणी क्र.१८ वर दाखल केली. त्यामुळे त्यांची जबानी अभियोगपक्षाच्या उपयोगाची नाही.

८. आरोपीच्या वतीने निशाणी १८—ब वर घटनास्थळ पंचनामा व निशाणी १८—अ वर फिर्यादीचे जखमीचे प्रमाणपत्र मान्य केले परंतु साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी अभियोगपक्षाच्या हकीकत प्रमाणे साक्ष दिली नाही, म्हणून त्यास महत्व प्राप्त होत नाही. सबब, अभियोगपक्षाची हकीकत ही शाबीत झाली नाही. सबब, अभिलेखावरील उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून प्रस्तुत आरोपीनेच गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने निसंशयपणे सिध्द केलेले नाही. त्यामुळे आरोपीच्या विरुध्द असलेला भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३३७ व ४२७ सह मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याचा दोषारोप नि: संशयरित्या शाबीत होत नाही. त्यायोगे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत.

**वादप्रश्न क्रमांक ५ करिता :—**

९. वादप्रश्न क्रमांक १ ते ४ च्या निष्कर्षांन्वये आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याच्या अनुमानास मी पोहचलेलो आहे. त्यामुळे वादप्रश्न क्रमांक ५ चा निष्कर्ष नोंदविण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) आरोपी शेख मुजीब शेख इब्राहीम, याची भारतीय दंड विधान, कलम २७९, ३३७ व ४२७ सह मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रीया संहीता, कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत प्रकरणात दाखल असलेले आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ अ अन्वये पुढे कायम ठेवण्यात येते.

KHAJA CHANDSAB KALAL

Digitally signed by KHAJA CHANDSAB KALAL
Date: 2026.08.11 13:45:07 +0530

दिनांक : ११/०८/२०२६

**(ख्वाजा चॉ. कलाल)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर,
ता. मंगरूळपीर, जि. वाशिम.

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Khwaja C. Kalal |
| Judgment uploaded by | :- | N.F.Syed (Stenographer-III) |
| Date of Judgment | :- | 11/08/2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 11/08/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 11/08/2026 |